कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, रामटेकम्, महाराष्ट्रम्
राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषदेद्वारे मान्यता प्राप्त ग्रेड "A+"
स्थापना 18 सप्टें. 1997

राष्ट्रहिताय संस्कृतम्

Kavi Kulguru Kalidas Sanskrit Vishwavidyalaya (University), Ramtek, Maharashtra
NAAC Accredited with "A+ " Grade
Established on 18th Sept, 1997

Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac **Examination Section** Email : exam@kksu.org / result@kksu.org

रामटेक कार्यालय: प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक, जिल्हा –नागपूर – 441 106 Ramtek Office - Administrative Building, Mouda Road, Ramtek – 441 106

जा. क्र. ककासंवि/परीक्षा/२०२५/१३४८ मा. कृ. १३ शके १९४७/दि. १७.१२.२०२५

# परिपत्रक क्र. २०/२०२५–२६

**विषय – सन २०२५–२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ** – १) सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. उशिनाग/अतिवृष्टी व पूर घोषित /३०३८/२०२५, दि. २५.११.२०२५ रोजीचे पत्र
२) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे शिष्य/पुरग्रस्त/२०२५/E-2392204, दि. २१.११.२०२५ रोजीचे पत्र.
३) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, शासन पत्र क्र. संकीर्ण–२०२५/प्र.क्र. १८८/ई–१३९२ २२९/मशि–३, दि. ०४.११.२०२५
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक – सीएलएस–२०२५/प्र.क्र. ३६५/म–३, (मदत –१), दि.१०ऑक्टोंबर,२०२५

याद्वारे विश्वविद्यालयाचे सर्व संलग्न महाविद्यालयांना कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. १ ते ०३ आणि शासन निर्णय क्र. ०४ अन्वये विविध तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे अशा एकूण २८२ तालुक्यांना आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आले आहे. सदर तालुक्यांमध्ये सर्व बाधितांना दुष्काळ सदृष्ट परिस्थिती लागू असणाऱ्या सर्व सवलतींना मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीची सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित तालुक्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय करण्यासाठी आवश्यतेनुसार पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त तरतूद उपलब्ध करून घेण्याकरिता पुरवणी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करणेस शासनाने कळविले आहे.

त्यानुसार विभागातील महाविद्यालये आणि विद्यापीठांना खालील प्रमाणे सूचना देण्यात आल्या आहे.

१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ११.१०.१९९३ नुसार परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस प्राप्त असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ११.१०. १९९३ या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करून पाठवावे.

२. सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहीले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन २०२५–२६ च्या अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालूक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपूर्तीची रक्कम परिगणना करून आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

३. त्याअनुषंगाने कोणत्याही परिस्थितीत अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४. विश्वविद्यालयाकडे प्राप्त झालेल्या सन २०२५–२६ च्या अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपूर्तीची रक्कम परिगणना करून आवश्यक रक्कमांची मागणी शासनाकडे करण्यात येईल.

उपर्युक्त मुद्यांची तसेच सोबत जोडलेल्या विवरणपत्रात व प्रमाणपत्रासह पात्र विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ सादर करण्यात यावी. अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहील्यास त्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील.

तरी उपर्युक्त प्रमाणे महाविद्यालयांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार तपासणीकरून पुढील प्रक्रिया करण्यात येईल.

धन्यवाद.

डॉ. केशव मोहरीर
परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीकरिता –

१) **मा. कुलगुरू**, कविकलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
२) **मा. कुलसचिव**, कविकलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
३) **मा. वित्त व लेखा अधिकारी**, कविकलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
४) **उपकुलसचिव**, महाविद्यालय विभाग, कविकलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक